# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३४** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- २४९** **दिनांक :-१२/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.१३/०२/२०२५ गुरुवार रोजी सकाळी - ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.३२ व दि.०५/०३/२०२५ बुधवार रोजी दुपारी- १.०० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.३३ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.१३/०२/२०२५ गुरुवार रोजी सकाळी - ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.३२ व दि.०५/०३/२०२५ बुधवार रोजी दुपारी- १.०० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.३३ चे कार्यवृत्त कायम करणे.

वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.१३/०२/२०२५ गुरुवार रोजी सकाळी - ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.३२ व दि.०५/०३/२०२५ बुधवार रोजी दुपारी- १.०० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.३३ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३४** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०२** **प्रशासक ठराव क्र :-२५०** **दिनांक :-१२/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/१९९२/२०२४-२५ दि.२१/०२/२०२५
३. मुख्यलेखा परिक्षक यांचा दि.०६/०२/२०२५ चा अभिप्राय
४. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.१६/०१/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि..०६/०२/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०१ राजमालती नगर स.नं.३११/२/३ व ३२०/१ब मधील रोड डांबरीकरण करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.४०,२६,३०४/- मात्रचे अपेक्षित खर्चास व तांत्रिक तसेच प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०१ राजमालती नगर स.नं.३११/२/३ व ३२०/१ब मधील रोड डांबरीकरण करणे आवश्यक आहे. सदर कामी महाराष्ट्र राज्य दरसुची सन- २०२२-२३ अनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. उक्त कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु.४०,२६,३०४/- मात्र खर्च अपेक्षित असुन पुढील तांत्रिक तथा प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**
महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.३४** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०३** **प्रशासक ठराव क्र :-२५१** **दिनांक :-१२/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/२०४५/२०२४-२५ दि.१०/०३/२०२५
३. मुख्यलेखा परिक्षक यांचा दि.५/०३/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.०३/०३/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.१०/०३/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.०६ दत्त कॉलनी येथील श्री.मोहन पुरुषोत्तम वाणी यांचे घरापासुन ते रिंगरोड कडेस जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रिटीकरण (पेव्हमेंन्ट) करणे कामास प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.०६ दत्त कॉलनी येथील श्री.मोहन पुरुषोत्तम वाणी यांचे घरापासुन ते रिंगरोड कडेस जाणाऱ्या रस्त्याचे काँक्रिटीकरण (पेव्हमेंन्ट) करणे आवश्यक आहे. सदर स्थळी अमृत योजनेमुळे झालेल्या खोदकामामुळे रस्त्याची दुरावस्था झालेली आहे. सदर रस्त्याचे यापुर्वी तात्पुरत्या वापराकरीता एम पी एम करण्यात आलेले असुन वाहतुकीची वर्दळ लक्षात घेता तात्काळ पी क्यु सी (काँक्रिटीकरण) करणे आवश्यक आहे. सदर रस्त्यावर वाहतुकीची वर्दळ मोठया प्रमाणात असुन काँक्रिटीकरण नसल्याकारणामुळे धुळीचे प्रमाण वाढलेले असल्याकारणामुळे रस्त्यांच्या पेव्हमेंटचे काम होणे अत्यावश्यक आहे.

प्रस्तुत कामी राज्य दर सुची सन २०२२-२३ नुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रु.२९,९६,८६८/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. तरी पर्यावरण विभागाकडील राष्ट्रीय शुध्द हवा उपकमाच्या अंतर्गत शिल्लक राहणाऱ्या निधीतुन प्रस्तावीत करणेस तसेच सदर खर्चाची रक्कम ही शिल्लक रक्कमेपेक्षा जास्त झाल्यास ही मनपा निधीतुन रस्ते व्यवस्था या लेखाशिर्षा अंतर्गत सदरचे अंदाजपत्रकांना मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३४** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०४** **प्रशासक ठराव क्र :-२५२** **दिनांक :-१२/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/२०३४/२०२४-२५ दि.०७/०३/२०२५

३. आयुक्त यांचा दि.११/०३/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ चे कलम ३ अन्वये जळगांव शहर महानगरपालिकेच्या सार्व.बांधकाम विभागातील नागरी लोकसेवा अधिसुचित करणेबाबत.

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ व ३ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

सह आयुक्त नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांच्या कडील परीपत्रक क्रं.नपप्रस/का-०८/इगव्हर्नस/DUTD/RTS/२०२५/ १६२ दि.०६/०१/२०२५ अन्वये राज्यातील सर्व महानगरपालिका यांना महाराष्ट्र सेवा हक्क अधिनियम २०१५ चे कलम ३ अन्वये विविध ७१ नागरी लोकसेवा अधिसुचित करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहे. त्यानुसार सार्व.बांधकाम विभागातील खाली नमुद प्रमाणे सेवांचे अधिसुचित करावयाचे आहेत.

| अ. क्रं. | लोकसेवेची सुची | आवश्यक कागदपत्रे | शुल्क | काल मर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | व्दितीय अपिलीय अधिकारी | सेवा अधिसुचित करणे बाबत शासन निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रस्ता खोदाई परवाना देणे | १.विविध नमुन्यातील अर्ज<br>२.संबंधित मनपाची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>३.शासनाने वेळावेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्र | १.कॉक्रिट रोड रु.४५००/- प्रति चौ.मी.<br>२.डांबरी रस्ते रु.३०००/- प्रति चौ.मी.<br>३.खडीचे रस्ते रु.१५००/- प्रति चौ.मी. (कच्चे रस्ते) | ३० दिवस | शहर अभियंता | महानगर पालिका अतिरीक्त आयुक्त | महानगर पालिका आयुक्त | --- |
| २. | भुमिगत दुरसंचार वाहीनी (आप्टीकल फायबर केबल टाकण्याकरीता परवानगी देणे) | १.विविध नमुन्यातील अर्ज<br>२.नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२१/C.R.२४२/UD-२० दि.१९/१२/२०२२ मधील Schedule III नुसार आवश्यक कागदपत्रे<br>३.शासनाने वेळावेळी विहित आवश्यक कागदपत्रे | नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२१/C.R.२४२/UD-२० दि.१९/१२/२०२२ मधील Schedule IV नुसार स्थानिक स्तरावर निश्चित केलेले शुल्क<br>१.कॉक्रिट रोड रु.४५००/- प्रति चौ.मी.<br>२.डांरबी रस्ते रु.३०००/- प्रति चौ.मी.<br>३.खडीचे रस्ते रु.१५००/- प्रति चौ.मी. (कच्चे रस्ते) | १.शासन निर्णय क्रमांक संकीर्ण२०२१/C.R.२४२/UD-२० दि.१९/१२/२०२२ मधील तरतुदी नुसार ६० दिवस | संबंधित नागरी महानगरपालिकेचे आयुक्त अथवा त्यांनी अतिरिक्त आयुक्त यांचेव्दारे प्राधिकृत इतर सुयोग्य व सक्षम अधिकारी | संबंधित जिल्हाचे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय दुरस्ंचार समिती | प्रधान सचिव माहिती तंत्रज्ञान विभाग व अध्यक्ष राज्यस्तरीय दुरसंचार समिती | शासन निर्णय क्रं.संकीर्ण ०९२२/ प्र.क्र.-३२ ना.वि.-३२ सोबतचे सहपत्र “८” दि.०९/०१/२०२४ (सहपत्र १ ते ११) |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | रस्तेवरील खड्डे बुजणे | नागरीकांचा तक्रारी अर्ज | नि:शुक्ल | १५ दिवस | शहर अभियंता | महानगर पालिका अतिरीक्त आयुक्त | महानगर पालिका आयुक्त | --- |
| ४. | गटारीवरील झाकणे सुस्थितीत ठेवणे | नागरीकांचा तक्रारी अर्ज | नि:शुक्ल | १५ दिवस | शहर अभियंता | महानगर पालिका अतिरीक्त आयुक्त | महानगर पालिका आयुक्त | --- |

वर नमुद प्रमाणे अ.क्रं. १ ते ४ लोकसेवा सुचि अधिसुचित करणे आवश्यक असल्याने त्यापैकी उपरोक्त नमुद सरच्या अ.क्रं. १ ते ४ सुचिंना मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ३ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३४** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०५** **प्रशासक ठराव क्र :-२५३** **दिनांक :-१२/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/२०२४/२०२४-२५ दि.०५/०३/२०२५
३. सहाय्यक संचालक,नगररचना यांचा दि.१७/०२/२०२५ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.०५/०२/२०२५ चा अभिप्राय
५. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.०४/०२/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.२१/०२/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील पदमालय रेस्ट हाऊस येथे नविन वॉटर ए.टी.एम. रोटरी क्लब जळगांव (पुर्व) यांच्या मार्फत लावणे बाबत.

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील पदमालय रेस्ट हाऊस येथे नविन वॉटर ए.टी.एम. रोटरी क्लब जळगांव (पुर्व) यांच्या मार्फत लावणे बाबत बांधकाम विभागाने नियमाप्रमाणे सविस्तर माहितीसह परिपूर्ण व अचूक प्रस्ताव पूढील सभेत सादर करावा.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**
महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.३४** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०६** **प्रशासक ठराव क्र :-२५४** **दिनांक :-१२/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. मिळकत व्यवस्थापक, मालमत्ता व्यवस्थापन विभाग यांचेकडिल जा.क्र./मा.व्य.वि./०९/२०२४-२५ दि.२४/०२/२०२५
३. मुख्यलेखा परिक्षक यांचा दि.११/०२/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त (महसुल) यांचा दि.०७/०२/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.१३/०२/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** मनपा मालकीची सि.स.नं.१९३७ (जुने सानेगुरुजी रुग्णालय जागा) या जागेवर वाहनतळाची सुविधा पैसे भरा व वापरा या तत्वावर वाहन तळ चालविणेस देणे कामी मा.महासभा/प्रशासकीय ठराव क्र.१८८ दिनांक २७/०९/२०२४ मध्ये स्पर्धात्मक ई-निविदा प्रसिध्द करणे या ऐवजी देकार रक्कम जाहिर सूचनाव्दारे दरपत्रक मागविणेस असा बदल करणे बाबत.

---

वाचा क्र.१ व मिळकत व्यवस्थापक, मालमत्ता व्यवस्थापन विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका मालकीची सि.स.नं. १९३७ ब,क,फ (जुने सानेगुरुजी रुग्णालय जागा) या जागेवर कार्यादेश क्र.जमनपा/ जा.क्र./१८७३/ मि.व्य./२०२३-२४ दि.१९/१०/२०२३ अन्वये एक वर्षाकरिता वाहन तळ चालविणे कामी धनश्री स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या,जळगांव यांना अभिकर्ता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. उक्त वाहन तळ मक्त्याची मुदत दिनांक १९/१०/२०२४ रोजी रात्री १२.००वा संपली असल्याने या जागेवर अभिकर्ता नेमणूकीसाठी ई-निविदा प्रक्रिया होईपावेतो मक्ता कालावधी संपल्यानंतर म्हणजेच दिनांक २०/१०/२०२४ रोजी पासुन मक्तेदार धनश्री स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या,जळगांव यांना मुदतवाढ देणेस मा.महासभा/ प्रशासक ठराव क्र.१८८ दि.२७/०९/२०२४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार अभिकर्त्यास मुदतवाढ देण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रकरणी महानगरपालिका मालकीची सि.स.नं.१९३७ (जुने सानेगुरुजी रुग्णालय जागा) सि.स.नं. १९३७ ब,क,फ (जुने सानेगुरुजी रुग्णालय जागा) या जागेवर वाहन तळ चालविणेस देणे कामी मागील सर्वाच्च देकार रक्कम रुपये २,५५,०००/- मात्रवर १०% वाढ करुन म्हणजेच रक्कम रुपये २,८०,५००/- मात्रवर एक वर्षाकरिता देकार रक्कम निश्चित करुन स्पर्धात्मक ई-निविदा क्र.१८ दि.१४/१०/२०२४ रोजी प्रसिध्द केली निविदा भरण्याच्या अंतिम दिनांक २१/१०/२०२४ रोजी पर्यत निविदा प्राप्त झाली नाही तसेच सार्वत्रिक विधानसभा निवडणूक आचार संहिता लागल्याने निविदेस मुदतवाढ देता आली नाही. तसेच सदर कामी फेर ई-निविदा क्र.१९ दिनांक १९/१२/२०२४ रोजी प्रसिध्द करणेत आली होती सदर निविदा भरण्याच्या अंतिम दिनांक ३०/१२/२०२४ रोजी अखेर पर्यत एकही निविदा प्राप्त झाली नाही. तसेच फेर ई-निविदेस दिनांक ०७/०१/२०२५ रोजी पर्यत मुदतवाढ देण्यात आली तरी देखील निविदा भरण्याच्या अंतीम दिनांक रोजी पर्यत एकही निविदा प्राप्त झाली नाही.

प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र शसनाचे दि.१ डिसेंबर,२००६ खरेदी धोरण प्रकरण क्र.४ मधील ४.४.३.१ निविदा कालावधीस मुदतवाढ :- क) एकही नाही अथवा एकच निविदा तांत्रीकदृष्ट्या पात्र ठरल्यास पुनर्निविदा काढण्यात यावी. रुपये दहा (१०) लाखापेक्षा कमी रकमेची निविदा असल्यास फक्त एकदाच मुदतवाढ देण्यात यावी. असे नमुद असल्याने प्रस्तुत निविदेस पुनर्निविदा काढण्यात आली असून एकदा मुदतवाढ़ देण्यात आली तरी देखील निविदा ई-निविदेस प्रतिसाद मिळालेला नाही.

सबब सदर वाहन तळ जागेकरिता ई-निविदेस प्रतिसाद का मिळत नाही याबाबत कारण मिमांसा केली असता सदर वाहन तळ पे अॅन्ड पार्ककरिता अभिकर्ता नेमणूक करणे कामी निविदाधारक यांना ई-निविदा भरणे कामी येणाऱ्या तांत्रीक अडचणीमुळे ई-निविदेस प्रतिसाद मिळत नाही. तरी महाराष्ट्र शासनाचे दि.१ डिसेंबर,२००६ खरेदी धोरण प्रकरण क्र.३.२.३ दरपत्रकाच्या आधारे खरेदी :- जेव्हा खरेदीची किंमत रुपये पाच हजार (रु.५,०००/-) पेक्षा जास्त व रुपये तीन लाख (रु.३,००,०००/-) पर्यत असेल तेव्हा खरेदी दरपत्रक मागवून (खुली स्पर्धात्मक निविदा न मागविता) करता येईल असे नमुद आहे.

तरी जळगांव शहर महानगरपालिका मालकीची सि.स.नं. १९३७ ब,क,फ (जुने सानेगुरुजी रुग्णालय जागा) या जागेवर वाहन तळ चालविणेस देणे कामी मा.महासभा/प्रशासकीय ठराव क्र.१८८ दिनांक २७/०९/२०२४ नुसार एक वर्षाकरिता निश्चित केलेली देकार रक्कम रुपये २,८०,५००/- मात्रवर स्पर्धात्मक ई-निविदा न मागविता जाहिर सुचनाद्वारे दरपत्रक मागविल्यास प्रतिसाद मिळणे अपेक्षीत आहे. तरी पुढील कालावधी करीता देकार रक्कम जाहिर सूचना प्रसिध्द करुन दरपत्रकाद्वारे मागविणेस मान्यता मिळण्यासाठी मिळकत व्यवस्थापक, मालमत्ता व्यवस्थापन विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३४** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०७** **प्रशासक ठराव क्र :- २५५** **दिनांक :-१२/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. सहाय्यक आयुक्त, (सार्व.स्वच्छता) यांचेकडिल जा.क्र./सार्व.स्वच्छता वि./११२७/२०२४-२५ दि.०४/०३/२०२५

३. सहाय्यक आयुक्त, (सार्व.स्वच्छता) यांचा दि.२५/०२/२०२५ चा अभिप्राय

४. मुख्यलेखा परिक्षक यांचा दि.०४/०३/२०२५ चा अभिप्राय

५. उपायुक्त यांचा दि.०३/०३/२०२५ चा अभिप्राय

६. आयुक्त यांचा दि.०४/०३/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत अधिकारी, कर्मचारी, महाविदयालय-शालेय विदयार्थी, बचत गटाच्या महिला, इत्यादिंना प्रशिक्षण देणेकामी शासनाच्या पॅनल वरील पॅनल एजन्सी All India Institute Of Local Self Government यांची विना निविदा नियुक्ती करणे तसेच रु.४२,९६,८६१/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणे बाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त, (सार्व.स्वच्छता) यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, यांना Swacchh Bharat Mission Knowledge Partner म्हणून केंद्र शासनाने Impaneled Egency म्हणून घोषित केले आहे. स्वच्छ भारत अभियान २.०. क्षमता बांधणी अंतर्गत विविध घटकांना प्रशिक्षण देणे अपेक्षित आहे. त्यास्तव जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव करिता स्वच्छ भारत अभियान २.० यातून क्षमता बांधणी (Capacity & Building) या घटकांतर्गत प्राप्त निधीतून पुढीलप्रमाणे क्षमता बांधणीच्या उद्देशाने विविध घटकांना प्रशिक्षण देण्याचे प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | प्रशिक्षणाचा विषय व घटक | प्रशिक्षणार्थी संख्या | प्रशिक्षणामध्ये इतर समाविष्ट बाबी |
|---|---|---|---|
| **१.** | दैनंदीन साफसफाई कामी मक्तेदार यांचेकडील सफ़ाई कामगारांना सुरक्षित साफसफाई व कचरा हाताळणी तसेच वैयक्तिक आरोग्याबाबतचे प्रशिक्षण देणे. | ४२५ | १.प्रशिक्षणासाठी हॉल.<br>२.प्रशिक्षक.३.चहा,पाणी,जेवण.४.पुष्पगुच्छ-८ नग.<br>५.प्रमाण पत्र.४२५ नग. ६.पेन-४२५ नग.<br>७.डायरी-४२५ नग. |
| **२.** | घंटागाडी तसेच इतर कचरा संकलन वाहनावरील मदतनीस, यांना कचरा विलगीकरण करून ओला,सुका व घरगुती घातक कचरा वर्गीकृत प्रमाणे घंटागाडीत संकलन करणे व कचरा हाताळणे बाबतचे प्रशिक्षण देणे. | १४० | १.प्रशिक्षणासाठी हॉल.२.प्रशिक्षक.<br>३.चहा,पाणी,जेवण.४.पुष्पगुच्छ-८ नग.<br>५.प्रमाण पत्र.१४० नग.६.पेन-१४० नग.<br>७.डायरी-१४० नग. |
| **३.** | शहरातील रस्ते व गटार,व्यापारी संकुले,बगीचा,इ.ठिकाणी दैनंदीन साफसफाई व घनकचरा व्यवस्थापनाचे वार्डस्तरावरील सूक्ष्म नियोजन करणे व साफसफाई कांमाचे पर्यवेक्षण करणे बाबतचे मोकादम यांना प्रशिक्षण देणे. | ५० | १.प्रशिक्षणासाठी हॉल.२.प्रशिक्षक.<br>३.चहा,पाणी,जेवण.४.पुष्पगुच्छ-८ नग.<br>५.प्रमाण पत्र.५० नग.६.पेन-५० नग.<br>७.डायरी-५० नग. |
| **४.** | स्वच्छता निरीक्षक व मुख्य स्वच्छता निरीक्षक यांना स्वच्छ भारत अभियान, स्वच्छ सर्वेक्षण, हागणदारी मुक्त शहर, कचरा मुक्त शहर, घानकचरा हाताळणी व व्यवस्थापन अधिनियम २०१६, सिंगल युज प्लास्टीक विक्री व वापरावर बंदी, नायलॉन मांजा, ओल्या कच-यावर कंपोष्टींग करणे, घनकचरा व्यवस्थापना संदर्भात मनपा यांची कर्तव्ये व जबाबदा-या इ.बाबत प्रशिक्षण देणे | २० | १.प्रशिक्षणासाठी हॉल.<br>२.प्रशिक्षक.<br>३.चहा,पाणी,जेवण.<br>४.पुष्पगुच्छ-८ नग.<br>५.प्रमाण पत्र.२०नग.<br>६.पेन-२०नग.<br>७.डायरी-२० नग. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | बचत गटाच्या महिलांना घनकचरा व्यवस्थापन व कचरा ओला, सुका, घरगुती घातक कचरा विलगीकृत करून देणे, सिंगल युज प्लास्टीकचा वापर टाळणे, वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता ठेवणे इ.बाबतचे प्रशिक्षण देणे. | ३०० | १.प्रशिक्षणासाठी हॉल.२.प्रशिक्षक.<br>३.चहा,पाणी,जेवण.४.पुष्पगुच्छ-८ नग.<br>५.प्रमाण पत्र.३०० नग.६.पेन-३०० नग.<br>७.डायरी-३०० नग. |
| ६. | शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थांना घनकचरा व्यवस्थापन व कचरा ओला, सुका, घरगुती घातक कचरा विलगीकृत करून देणे, सिंगल युज प्लास्टीकचा वापर टाळणे,वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता ठेवणे इ.बाबतचे प्रशिक्षण देणे. | ३०० | १.प्रशिक्षणासाठी हॉल.२.प्रशिक्षक.<br>३.चहा,पाणी,जेवण.४.पुष्पगुच्छ-८ नग.<br>५.प्रमाण पत्र.३०० नग.६.पेन-३०० नग.<br>७.डायरी-३०० नग. |
| ७. | घनकचरा व्यवस्थापन, मलनिस्सारण, विभागातील अधिकारी व कर्मचारी प्रशिक्षण कार्यशाळा व गोवा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास भेट देणे. | १० | १.प्रशिक्षण ठिकाणी निवासाची राहण्याची व्यवस्था करणे.<br>२.चहा,नाश्ता,जेवण. ३.प्रमाणपत्र. ४.पेन.१०,<br>५.डायरी.१० |
| ८. | सफाई कर्मचा-यांना घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प इंदोर मध्य प्रदेश येथे स्वच्छ सर्वेक्षण २०२४ च्या मार्गदर्शक सूचनेनूसार पिर व्हिजीट राबविणे.इ.घटकांना घनकचरा व्यवस्थापन व वैयक्तिक तसेच सार्वजनिक स्वच्छता बाबत विविध प्रकारचे प्रशिक्षण देणेकामी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था नाशिक केंद्रामार्फत वरील सर्व घटकांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा व घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास भेटीचा कार्यक्रम आयोजित करणे. | ५० | १.प्रशिक्षक,<br>२.चहा,पाणी,जेवण.<br>३.पुष्पगुच्छ-८ नग.<br>४.प्रमाण पत्र.५० नग.<br>५.प्रकल्पास भेट<br>देण्यासाठी इंदोर शहरातील<br>वाहतूक व्यवस्था करणे. |
| ९. | शहरातील कचरा वेचक यांना कचरा वेचतांना सुरक्षितता व आरोग्याबाबत काळजी घेणे, तसेच साश्वत उपजिविका बाबत मार्गदर्शन करणे. | ४० | १.प्रशिक्षक,<br>२.चहा,पाणी,जेवण.<br>३.प्रमाण पत्र.४० नग |
| १०. | वैयक्तिक शौचालय सेप्टीक टॅक रिकामे करणारे वाहनावरील कर्मचा-यांना प्रात्यक्षिक तसेच सुरक्षितता व आरोग्याबाबत काळजी घेणे बाबतचे प्रशिक्षण देणे. | १० | १.प्रशिक्षक,<br>२.चहा,पाणी,जेवण.<br>३.प्रमाण पत्र.१० नग |

उपरोक्त नुसार स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत क्षमता बांधणी अंतर्गत शिल्लक निधी रक्कम रु.प्रशिक्षण कार्यशाळा राबविणे साठी, स्वच्छ भारत अभियानाशी निगडीत कामकाजाची क्षमता बांधणी करण्यासाठी केंद्र शासनाच्या आवास आणि शहरी मंत्रायल कडील दि.०८/१२/२०२३ चे पत्रानूसार अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांना विना निविदा नियुक्त करणेकामी तसेच शिल्लक निधी रक्कम रु.४२,९६,८६१/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळण्यासाठी सहाय्यक आयुक्त,(सार्व.स्वच्छता) यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३४** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०८** **प्रशासक ठराव क्र :-२५६** **दिनांक :-१२/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. सहाय्यक आयुक्त, (सार्व.स्वच्छता) यांचेकडिल जा.क्र./सार्व.स्वच्छता वि./११२८/२०२४-२५ दि.०४/०३/२०२५

३. मुख्यलेखा परिक्षक यांचा दि.०३/०३/२०२५ चा अभिप्राय

४. उपायुक्त यांचा दि.२८/०२/२०२५ चा अभिप्राय

५. आयुक्त यांचा दि.०४/०३/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** सार्वजनिक स्वच्छता-आरोग्य विभागाकडील महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत सेवा अधिसूचित करणे व वगळणे बाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त, (सार्व.स्वच्छता) यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत जशमनपा सार्वजनिक स्वच्छता (आरोग्य) विभागाकडील पुढील सेवा अधिसूचित करणे व वगळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

| अ.क्र | सेवेचा तपशिल | आवश्यक कागदपत्रे | फ़ी | नियत काल मर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राज्य खाद्य परवान्याकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचा ना हरकत दाखला. | १.विहीत नमून्यातील अर्ज.<br>२.संबंधित मनपाची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>३.ज्या इमारतीत सदर आस्थापना/कारखाना होणार आहे त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे.<br>४.शासनाव्दारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | रुपये ५००/- | ३० दिवस | स्वच्छता निरीक्षक | उपायुक्त (आरोग्य). | आयुक्त |
| २ | खाद्य नोंदणी परवान्याकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचा आरोग्य विषयक ना हरकत दाखला. | १.विहीत नमून्यातील अर्ज.<br>२.संबंधित मनपाची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>३.ज्या इमारतीत सदर आस्थापना/कारखाना होणार आहे त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे.<br>४.शासनाव्दारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | रुपये ५००/- | ३० दिवस | स्वच्छता निरीक्षक | उपायुक्त (आरोग्य). | आयुक्त |
| ३ | शहरात स्वच्छता ठेवणे. | पुराव्यासह अर्ज.उदा.जीओ टॅग केलेले फ़ोटो इत्यादी. | रुपये ५००/- | १ दिवस | स्वच्छता निरीक्षक | उपायुक्त (आरोग्य). | आयुक्त |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | अन्न निर्मीती संबंधी ना हरकत दाखला | संदर्भ क्र.३.चे आदेशान्वये मनपाकडील अन्न सुरक्षा अधिकारी यांची सेवा अन्न व औषध प्रशासन विभागाकडे दि.०६/१२/२०१८ पासून कायमस्वरूपी वर्ग करण्यात आली आहे. त्यामुळे सदरची सेवा जशमनपा कडून दिली जात नाही. त्यास्तव सदरची सेवा यादीतून वगळण्यात यावी ही विनंती. | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ५. | अ).गुरे ढोरे पाळणे जनावरांसाठी गोठा परवाना देणे. (महा. म.अधि.१९४९ चे कलम ३८६ अन्वये.) | वरीलप्रमाणे | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| | ब).आईस्क्रीम, चहापेय, विक्री करणारे मिठाई दुकाने, वायु मिश्रीत पेय, कुल्फ़ी, उसाचा रस विक्रेता, फ़ोडी किंवा सोललेली फ़ळे, मानवी आहारासाठी योजलेले अन्य किंवा अन्न पदार्थ कामी परवाने. (महा.म.अधि.१९४९ चे कलम ३८३ अन्वये.) | वरीलप्रमाणे | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| | क).डेअरी किंवा दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी परवाना, देणे. (महा.म.अधि.१९४९ चे कलम ३८३ अन्वये.) | वरीलप्रमाणे | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| | ड).फ़ेरीने माल विक्रीसाठी परवाना,कोणतीही वस्तु मग ती मानवी आहारासाठी असो किंवा नसो फ़ेरीने विक्रीसाठी मांडण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही सार्वजनिक रस्त्याचा वापर करण्यासाठी. | वरीलप्रमाणे | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ६. | परवान्याचे नुतनीकरण | वरीलप्रमाणे | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ७. | परवाना हस्तांतरण | वरीलप्रमाणे | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ८. | परवाना दुय्यम प्रत | वरीलप्रमाणे | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ९. | व्यवसायाचे नांव बदलणे | वरीलप्रमाणे | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १०. | व्यवसाय बदलणे | वरीलप्रमाणे | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| ११. | परवाना धारक / भागीदाराचे नांव बदलणे | वरीलप्रमाणे | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| १२. | भाग़ीदारांच्या संख्येत बदल (वाढ / कमी) | वरीलप्रमाणे | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| १३. | परवाना रद्द करणे | वरीलप्रमाणे | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |
| १४. | कालबाह्य परवान्यासाठी नुतनीकरण सूचना | वरीलप्रमाणे | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

आयुक्त, मनपा जळगांव यांचे कडील जा.क्रं./प्रका/३१६६/२४-२५ दि.२८/०१/२०२५ रोजीच्या आदेशान्वये मनपा यादितील एकुण ५९ सेवांपैकी सार्वजनिक स्वच्छता - आरोग्य विभागाकडील अ.क्र.१ ते ३ च्या सेवा अधिसूचित करणेकामी सेवांचा तपशिल सादर असून सदर सेवांसाठी लागणारे आवश्यक कागदपत्रे व शुल्क याबाबत अंतीम निर्णय घेणे व सेवा अधिसूचित करणेस तसेच उपरोक्त अ.क्र.४ ते १४ नूसारच्या सेवा अन्न्न सुरक्षा विभाग शासनाकडील विभाग़ाकडेस वर्ग करण्यात आलेल्या असल्याने त्या सेवा वगळणे कामी मान्यता मिळण्यासाठी सहाय्यक आयुक्त (सार्व.स्वच्छता) यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३४** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०९** **प्रशासक ठराव क्र :-२५७** **दिनांक :-१२/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त सार्व.स्वच्छता विभाग यांचेकडिल जा.क्र./सार्व.स्वच्छता/११५०/२०२४-२५ दि.११/०३/२०२५
३. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.१०/०३/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.१०/०३/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.१०/०३/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० जशमनपाचे सामुदायिक/सार्वजनिक/आकांषी/व्यापारी संकुलातील २०१४ पुर्वीचे शौचालये, मुतारी, स्नानगृहे दुरुस्ती तसेच नव्याने बांधकाम करणेकामी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे कामी, All India Institute Local Self Government यांची विना निविदा PMC (प्रकल्प तांत्रिक सल्लागार) म्हणून नियुक्ती करणे बाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक आयुक्त सार्व.स्वच्छता विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

उपसचिव तथा राज्य अभियान संचालक स्व.म.अ.(ना) यांचेकडील जा.क्रं./राअस/स्वच्छ शौचालय/८३५/२३-२४ दि.०५/१२/२०२३ रोजीचे पत्रानुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० (ना) अंतर्गत सामुदायिक / सार्वजनिक / आकांक्षी / व्यापारी संकुलातील, २०१४ पुर्वीचे शौचालये,मुतारी,स्नानगृहे दुरूस्ती तसेच नव्याने बांधकाम करणेकामी अनुदान अनुज्ञेय आहे.

त्यानुसार जशमनपाचे सन-२०१४ पुर्वीचे बांधकाम असलेले नादुरूस्त शौचालये,स्नानगृहे,मुतारी, दुरूस्ती करणे तसेच नवीन बांधकाम करणेकामी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून शासनास सादर करणे आवश्यक आहे.त्यासाठी PMC (प्रकल्प तांत्रिक सल्लागार) संस्थेची नियुक्ती करणेकामी प्रशासक तथा आयुक्त मनपा जळगांव यांचेकडील दि.२०/०९/२०२४ रोजीचा ठराव क्रं.१७० चे ठरावानुसार मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.०.जशमनपाचे सामुदायिक/सार्वजनिक/आकांक्षी/ व्यापारी संकुलातील २०१४ पुर्वीचे शौचालये,मुतारी,स्नानगृहे दुरूस्ती तसेच नव्याने बांधकाम करणेकामी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेकामी All India Institute Local Self Government यांची विना निविदा PMC (प्रकल्प तांत्रिक सल्लागार) संस्थेची खालिल अटि व शर्तीस आधिन राहुन नियुक्ती करता येईल.

सर्व साधारण अटि व शर्ती खालिल प्रमाणे आहेत.

**१.** संस्था शासन नोंदणीकृत असणे व त्याबाबतचे वैध प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
**२.** संस्थेकडे सदर कामाचा कोणत्याही एक स्थानिक स्वराज्य संस्थेकडील PMC म्हणून काम केल्याचा अनूभव दाखला / प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.
**३.** नियुक्त संस्थेने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून तांत्रिक व प्रशासकीय मान्यता तसेच शासनाच्या मंजुरी अंती प्रत्यक्ष कामावर तांत्रिक पर्यवेक्षण करणे बंधनकारक राहील.
**४.** संस्थेकडे आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ (गुन्हेगारी पार्श्वभुमी नसलेले) असणे अनिवार्य आहे.
**५.** कामाचे शुल्क निधी उपलब्धतेनुसार अदायगी केली जाईल.अदायगीस विलंब झाल्यास कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.
**६.** नियुक्त कामागारांचे भविष्य निर्वाह निधी आणि शासकीय विमा इ.भरण्याची संपुर्ण जबाबदारी नियुक्त संस्थेची राहील.
**७.** कामगार कायद्याचे तंतोतंत पालन करणे नियुक्त संस्थेस बंधनकारक राहील.तसेच नियुक्त कामगारांना कोणत्याही प्रकारचा मोबदला व हक्क जशमनपास मागता येणार नाही.
**८.** आयुक्त व त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांचा सूचनेनुसार काम करणे नियुक्त संस्थेस बंधनकारक राहील.
**९.** सदर कामाच्या बाबतीत अंतीम निर्णय आयुक्त मनपा जळगांव यांचा राहील.
**१०.**सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून सादर करण्याचा कालावधी कार्यादेशापासून ३० दिवसांचा राहील.

उपरोक्त अटि व शर्ती व्यतिरिक्त आवश्यक इतर अटींचा समावेश करता येईल.करिता All India Institute Local Self Government यांची विना निविदा PMC (प्रकल्प तांत्रिक सल्लागार) म्हणून नियुक्ती करणेकामी मान्यता मिळण्यासाठी सहाय्यक आयुक्त,सार्व.स्वच्छता विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३४** **(महासभा)**

**विषय क्र.:- १०** **प्रशासक ठराव क्र :-२५८** **दिनांक :-१२/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचेकडिल जा.क्र./न.र./१३५७/२०२५ दि.१०/०३/२०२५

३. आयुक्त यांचा दि.०७/०३/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ अंतर्गत नगररचना विभागाकडील लोकसेवा अधिसुचित करणे बाबत.

वाचा क्र.१ व सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा वाचा क्र. २ ते ३ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

उपायुक्त, सा.प्र.यांचेकडील कार्यालयीन आदेश जा.क्र/प्र.का/२९२८/२०२५ दि.०९/०१/२०२५ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत कलम ३ अन्वये विविध ७१ नागरी लोकसेवा अधिसुचीत करणे बाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१५/प्र.क्र.१८९/नवि-१४ दि.२३/०६/२०१५ अन्वये नगररचना विभागाकडील अ.क्रं.८अ, ८ब व १० अन्वये अनुक्रमे भाग नकाशा, झोन दाखला व RoW आणि Mobil Tower (दुरसंचार पायाभुत सुविधा उभारणी परवानगी) हया सेवा नगररचना विभागाशी संबंधीत असलेली लोकसेवा असुन खालील तक्त्यातील सदर सेवांची नियत कालमर्यादा, आवश्यक कागदपत्रे, फी, पदनिर्देशीत अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी व व्दितीय अपिलीय अधिकारी या बाबतची खालील प्रमाणे माहिती देण्यात येत आहे.

संदर्भाकीत आदेशासोबत अधिसुचीत करावयाच्या लोकसेवा यांची यादी प्राप्त झालेली आहे. प्रस्तुत यादीत नगररचना विभागाकडील भाग नकाशा देणे व मोबाईल टावर परवाना या सेवा समाविष्ट आहेत, मात्र अदयापपावेतो अधिसुचीत करण्यात आलेल्या नाहीत.

भाग नकाशा व झोन दाखला बाबत शासन निर्णय-क्र.संकिर्ण-५०१९/प्र.क्र.११४/२०१९/नवि-२७ दि.२८/१०/२०२० मधील विवरण पत्र 'अ' नुसार शुल्क निश्चित करण्यात आलेले आहेत. तसेच मोबाईल टावर परवाना ऐवजी या बाबतच्या परवान्यास RoW आणि Mobil Tower (दुरसंचार पायाभुत सुविधा उभारणी परवानगी) या प्रमाणे नमुद करण्यात आले असुन याबाबत संचार मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील राजपत्र दि.१७/०९/२०२४ रोजी अधिसुचीत केलेनुसार तसेच शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२१/सी.आर.२४२/युडी-२०, मंत्रालय मुंबई ३२, दि.१९/१२/२०२२ या मध्ये नमुद केलेले मार्गदर्शक तत्वांसह व शासनाचे दि.१२/११/२०२४ चे पत्रातील निर्देशानुसार केंद्र शासनाच्या गतीशक्ती पोर्टलव्दारे कार्यवाही करण्यात येईल. तरी खालील तक्तात नमुद केल्यानुसार अधिसुचीत करणे आवश्यक आहे.

| अ. नं. | लोकसेवांचा तपशिल | आवश्यक कागदपत्रे | लोकसेवा पुरविण्यासाठी निश्चीत निर्धारीत शुल्क | | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | व्दितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८अ | भाग नकाश देणे | १)विहीत अर्ज, २)अलिकडील तारखेचा मालकी हक्काचा उतारा, ३)जागेचा मोजणी नकाशा, ४)सि.स.मोजणी नकाशा | नकाशा पुर्ण आकार (ए-४ साईज | ७००/- | ७ दिवस | सहायक नगरररचनाकार | नगर रचनाकार | सहा.संचालक नगररचना |
| | | | नकाशा (ए-३ साईज) | ११००/- | | | | |
| | | | नकाशा (ए-२ साईज) | १५००/- | | | | |
| | | | नकाशा (ए-१ साईज) | २५००/- | | | | |
| | | | नकाशा (ए-० साईज) | ६८००/- | | | | |
| | | | न.र.यो.तील अ.भु.व त्याचा मु.भु. दर्शविणारा भाग नकाशा | ७००/- | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | दोन अ.भु.व त्याचा मु.भु. दर्शविणारा भाग नकाशा | १५००/- | | | | |
| | | | दोन पेक्षा अधिक अ.भु.व मु.भु. चा भाग नकाशा | २५००/- | | | | |
| ८ब | झोन दाखला | १)विहीत अर्ज, २)अलिकडील तारखेचा मालकी हक्काचा उतारा, ३)जागेचा मोजणी नकाशा, ४)सि.स.मोजणी नकाशा | विकास योजना झोन दाखला | ७००/- | ७ दिवस | सहायक नगर रचनाकार | नगर रचनाकार | सहा. संचालक नगररचना |
| | | | न.र.यो.तील अ.भु.सनदेच्या प्रथम प्रतीसाठी | ३०००/- | | | | |
| | | | न.र.यो.तील अ.भु.सनदेच्या दुसऱ्या प्रतीसाठी | ८००/- | | | | |
| | | | न.र.योजना पुस्तकामधील एका अ.भु.नोंदीच्या उताऱ्यासाठी | २००/- | | | | |
| | | | मंजुर वि.यो./प्रादेशिक योजने मधील एक स.नं./गट नं.च्या प्रमाणपत्राच्या एका प्रतीसाठी | ३००/- | | | | |
| | | | विकास योजना नकाशे, भाग नकाशे यांची सीडी पुरविणे (१ जी.बी.पर्यंत सीडी साठी) | ५००/- | | | | |
| | | | मंजुर रेखांकन/बांधकाम नकाशाच्या सत्यप्रती व आदेशाची (शिफारस) प्रत. | पत्र/आदेशाचे रु.५/- प्रती पान एन-४ रु.५०/-<br>ए-३ रु.१००/-<br>ए-२ रु.१५०/-<br>ए-१ रु.२०० | | | | |

## मोबाईल टावर परवानगी बाबत.

| अ. नं. | लोकसेवांचा तपशिल | आवश्यक कागदपत्रे | फी | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | व्दितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | RoW आणि Mobil Tower (दुरसंचार पायाभुत सुविधा उभारणी परवानगी) | १. संचार मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील राजपत्र दि.१७/०९/२०२४ रोजी अधिसुचीत केलेनुसार<br>२. शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२१/सी.आर.२४२/युडी-२०, मंत्रालय मुंबई ३२, दि.१९/१२/२०२२ या मध्ये मार्गदर्शक तत्वांसह विहीत नमुन्यातील अर्ज व त्या सोबत लागणारे सर्व कागदपत्रांची यादी याप्रमाणे<br>३. केंद्र शासनाच्या गतीशक्ती पोर्टलव्दारे (शासनाचे दि.१२/११/२०२४ चे पत्रानुसार) | भारत सरकार राजपत्रात दि.१७/०९/२०२४ मध्ये जोडलेल्या 'अनुसुची' नुसार | ६७ दिवस | नगर रचनाकार | सहा. संचालक नगररचना | आयुक्त |

नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१५/प्र.क्र.१८९/नवि-१४ दि.२३/०६/२०१५ नुसार उक्त तक्त्यातील तीन सेवा अधिसुचीत करणेस मान्यता मिळणेसाठी सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ३ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**
महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.३४** **(महासभा)**

**विषय क्र.:- ११** **प्रशासक ठराव क्र :-२५९** **दिनांक :-१२/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. प्रमुख वैदयकिय अधिकारी, दवाखाना विभाग यांचेकडिल जा.क्र./दवाखाना वि./३७३२/२०२४-२५ दि.१०/०३/२०२५
३. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.१०/०३/२०२५ चा अभिप्राय
४. उपायुक्त यांचा दि.१०/०३/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.१०/०३/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** दवाखाना विभागाकडील म.लो.ह.अंतर्गत महाराष्ट्र शुश्रृषा गृह नोंदणी अधिनियम १९४९ अंतर्गत शुश्रृषा गृह परवाना देणे बाबत.

---

वाचा क्र.१ व प्रमुख वैदयकिय अधिकारी, दवाखाना विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

| अ. नं. | लोकसेवेचा तपशिल | आवश्यक कागदपत्रे | फी | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | व्दितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र शुश्रृषा गृह नोंदणी अधिनियम १९४९ अंतर्गत शुश्रृषा गृह परवाना देणे | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | १) फॉर्म फि रु.१५/-<br>२) १ ते ५ खाटांसाठी ३ वर्षाकरिता रु.३,५००/-<br>३) ५ पेक्षा जास्त खाटा असलेल्या शुश्रृषागृहाला प्रत्येकी ५ वाढीव खाटांबाबत उपरोक्त दरांनुसार वाढीव शुल्क आकारण्यात येईल. | ३० दिवस | प्रमुख वैदयकिय अधिकारी | अतिरीक्त महानगर पालिका आयुक्त | महानगर पालिका आयुक्त |
| २. | महाराष्ट्र शुश्रृषा गृह नोंदणी अधिनियम १९४९ अंतर्गत शुश्रृषा गृह परवान्याचे नुतनीकरण | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | १) फॉर्म फि रु.१५/-<br>२) १ ते ५ खाटांसाठी ३ वर्षाकरिता रु.३,५००/-<br>३) ५ पेक्षा जास्त खाटा असलेल्या शुश्रृषागृहाला प्रत्येकी ५ वाढीव खाटांबाबत उपरोक्त दरांनुसार वाढीव शुल्क आकारण्यात येईल.<br>४) शुश्रृषागृहाच्या नुतनीकरणासाठी पुर्वी नोंदणी किंवा नुतनीकरणासाठी आकारलेल्या शुल्काच्या २५ टक्के वाढीव शुल्क आकारला जाईल. | ३० दिवस | प्रमुख वैदयकिय अधिकारी | अतिरीक्त महानगर पालिका आयुक्त | महानगर पालिका आयुक्त |
| ३. | महाराष्ट्र शुश्रृषा गृह नोंदणी अधिनियम १९४९ अंतर्गत शुश्रृषा गृह परवान्यावर परवानाधारक/ भागीदाराचे नाव बदलणे | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | १) शुश्रृषा गृह परवान्यावर परवानाधारक/ भागीदाराचे नाव बदलणे शुल्क रु.३,५००/- | ३० दिवस | प्रमुख वैदयकिय अधिकारी | अतिरीक्त महानगर पालिका आयुक्त | महानगर पालिका आयुक्त |

उपरोक्त अ.क्र.१ ते ३ च्या सेवा अधिसूचित करणेकामी सेवांचा तपशिल सादर असून सदर सेवांसाठी लागणारे आवश्यक कागदपत्रे व शुल्क याबाबत अंतीम निर्णय घेणे व सेवा अधिसूचित करणेस मान्यता मिळणेसाठी प्रमुख वैदयकिय अधिकारी, दवाखाना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३४** **(महासभा)**

**विषय क्र.:- १२** **प्रशासक ठराव क्र :-२६०** **दिनांक :-१२/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. शहर अभियान व्यवस्थापक, DAY-NULM विभाग यांचेकडिल जा.क्र./फेरीवाला डॉकेट/२८०/२०२४-२५ दि.११/०३/२०२५

३. अतिक्रमण अधिक्षक यांचा दि.११/०३/२०२५ चा अभिप्राय

४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.११/०३/२०२५ चा अभिप्राय

५. आयुक्त यांचा दि.११/०३/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ अंतर्गत फेरीवाले नोंदणी प्रमाणपत्र देणे बाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियान व्यवस्थापक, DAY-NULM विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

उपायुक्त, सा.प्र.यांचेकडील कार्यालयीन आदेश जा.क्र/प्र.का/२९२८/२०२५ दि.०९/०१/२०२५ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत कलम ३ अन्वये विविध ७१ नागरी लोकसेवा अधिसुचीत करणे बाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१५/प्र.क्र.१८९/नवि-१४ दि.२३/०६/२०१५ अन्वये DAY-NULM व अतिक्रमण विभागाकडील अ.क्रं.१४ DAY-NULM व अतिक्रमण फेरीवाले नोंदणी प्रमाणपत्र देणे अ.क्रं.१० मधील क्र.०८ फेरीवाले नोंदणी प्रमाणपत्र देणे DAY-NULM व अतिक्रमण विभागाशी संबंधित असलेली लोकसेवा असुन खालील तक्त्यातील सदर सेवांची नियत कालमर्यादा, आवश्यक कागदपत्रे, फी, पदनिर्देशीत अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी व व्दितीय अपिलीय अधिकारी या बाबतची माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ. नं. | लोकसेवेची सूची | आवश्यक कागदपत्रे | फी | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | व्दितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | फेरीवाले नोंदणी प्रमाणपत्र देणे | १)विहीत नमुन्यातील अर्ज,<br>२)शासनाने वेळोवेळी विहित केले जातील असे आवश्यक कागदपत्रे | ५००/- | १५ दिवस | संबंधित परवाना देण्याकरिता प्राधिकृत केलेला सक्षम अधिकारी (उपायुक्त) | अतिरिक्त आयुक्त | महानगर पालिका आयुक्त |

नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१५/प्र.क्र.१८९/नवि-१४ दि.२३/०६/२०१५ नुसार उक्त तक्त्यात एक सेवा अधिसुचीत करणेस मान्यता मिळणेसाठी शहर अभियान व्यवस्थापक, DAY-NULM विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३४** **(महासभा)**

**विषय क्र.:- १३** **प्रशासक ठराव क्र :-२६१** **दिनांक :-१२/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचेकडिल जा.क्र./ज.श.म.न.पा./पा.पु.वि./३२३/२०२५ दि.११/०३/२०२५
३. शहर अभियंता यांचा अभिप्राय
४. सहाय्यक आयुक्त यांचा दि.११/०३/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.११/०३/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.११/०३/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ अंतर्गत विविध लोकसेवा अधिसूचित करणेबाबत.

---

वाचा क्र.१ व उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

उपायुक्त (सा.प्र.) यांचेकडील जा.क्र./प्र.का. /२९२८/२०२४-२५ दिनांक ०९/०१/२०२५ अन्वये विविध शासन निर्णयान्वये महाराष्ट्र लोकसेवा अधिनियम २०१५ चे कलम ३ अन्वये विविध ७१ नागरी लोकसेवा अधिसूचीत करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. यापुर्वी पाणी पुरवठा विभागांमार्फत खालील ०४ सेवा अधिसूचित करण्यात आलेल्या आहे.

१. प्लंबर परवाना.
२. प्लंबर परवाना नूतनीकरण करणे.
३. पाण्याची दबाव क्षमता.
४. पाण्याची गुणवत्ता तक्रार.

सद्यास्थितीत मा. उपायुक्त (सा.प्र.) यांच्या पत्रातील आदेशानुसार व विविध शासन निर्णयान्वये निर्देशित केल्यानुसार महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ कलम ०३ अंतर्गत पाणी पुरवठा विभागाकडील खालील प्रस्तावित सेवा अधिसूचीत करणे आवश्यक आहे.

१. जलनिस्सारण जोडणी देणे.
२. नादुरुस्त मीटर तक्रार करणे.
३. अनधिकृत नळ जोडणी तक्रार करणे.
४. पाणी अनुपलब्धता प्रमाणपत्र देणे

तसेच पाणी पुरवठा विभागाकडील १. जलनिस्सारण जोडणी देणे. २. नादुरुस्त मीटर तक्रार करणे. ३. अनधिकृत नळ जोडणी तक्रार करणे. ४. पाणी अनुपलब्धता प्रमाणपत्र देणे इ. लोकसेवांकरीता खालील तकत्यात नमूद केलेनुसार सेवांची सूची, आवश्यक कागदपत्रे, सेवाकरीताचे शुल्क ( फी ), नियत कालमर्यादा, पदनिर्देशीत अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी, द्वितीय अपिलीय अधिकारी याबाबतची प्रस्तावित माहिती अधिसूचीत करणे आवश्यक आहे.

| **अ.क्र.** | **लोकसेवेची सूची** | **आवश्यक कागदपत्रे** | **शुल्क** | **काल मर्यादा** | **पदनिर्देशीत अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** | **द्वितीय अपिलीय अधिकारी** | **सेवा अधिसूचीत करणे बाबत शासन निर्णय** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जलनिस्सारण जोडणी देणे | १. विहीत नमून्यातील अर्ज. २. जागा मालकीची कागदपत्रे ३. थकबाकी नसल्याचा दाखला | १०००/- | १५ दिवस | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता | शासन निर्णय क्र.-एमसीओ-२०१५/प्र.क्र.१८९/न.वि.-१४ दि. २३/०६/२०१५ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | नादुरुस्त मीटर तक्रार करणे. | १. विहीत नमून्यातील अर्ज. | सध्यास्थितीत मीटर बसविले नाहीत. तरी मीटर बसविल्या नंतर मनपा स्तरावर मा. महासभा यांचेद्वारे निश्चित होणारे दर. | ७ दिवस | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता | शासन निर्णय क्र.- संकीर्ण - २०१५/प्र.क्र.३९८/ न.वि.-२० दि. ०४/०९/२०१७ |
| ३ | अनधिकृत नळ जोडणी तक्रार करणे | १.विहीत नमुन्यातील अर्ज, | अनधिकृत नळ जोडणी सिद्ध झाल्यास व्यासाप्रमाणे मागील दोन वर्षाची मनपा पाणीपट्टी अधिक नळ जोडणी प्रचलित शुल्क आकारणी करण्यात येईल. | ०७ दिवस | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता | शासन निर्णय क्र.- संकीर्ण - २०१५/प्र.क्र.३९८/ न.वि.-२० दि. ०४/०९/२०१७ |
| ४ | पाणी अनुपलब्धता प्रमाणपत्र देणे | १.विहीत नमुन्यातील अर्ज.<br>२. म.न.पा ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>३. ना हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर भोगवट प्रमाणपत्र घेणेबाबतचे व पर्जन्य जल पुनर्भरण करणे बाबतचे प्रतिज्ञापत्र<br>४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | ५०/- | ३० दिवस | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता | शासन निर्णय क्र.- संकीर्ण - २०१५/प्र.क्र.३२/न .वि.-३२ दि. १५/१२/२०२२ |

**उपरोक्त प्रमाणे पाणी पुरवठा विभागाकडील प्रस्तावित ०४ सेवांची सूची, आवश्यक कागदपत्रे, सेवाकरीताचे शुल्क ( फी ), नियत कालमर्यादा, पदनिर्देशीत अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी, द्वितीय अपिलीय अधिकारी याबाबतची प्रस्तावित माहिती अधिसूचीत करणेस मान्य**ता मिळणेसाठी उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

## MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.३४** **(महासभा)**

**विषय क्र.:- १४** **प्रशासक ठराव क्र :-२६२** **दिनांक :-१२/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. वाहन व्यवस्था विभाग प्रमुख यांचेकडिल जा.क्र./९६/२०२५ दि.११/०३/२०२५
३. सहाय्यक आयुक्त यांचा दि.२८/०२/२०२५ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.११/०३/२०२५ चा अभिप्राय
५. उपायुक्त यांचा दि.०६/०३/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.११/०३/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** महानगरपालिका प्रशासकीय कामकाजाकरिता ०४ नग नविन स्विफ्ट डिझायर व्हि.एक्स.आय 1.2L ISS 5 MT खरेदी बाबत प्रस्ताव.

---

वाचा क्र.१ व वाहन व्यवस्था विभाग प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका प्रशासकीय सेवेत आज रोजी एकुण १३ वाहने कार्यान्वीत आहेत (मारुती सुझुकी कंपनीचे ०१ ग्रॅन्ड व्हिटारा, ०२ सियाज, ०२ फ्रॉक्स, ०१ स्विफट डिझायर, ०५ टाटा इंडिगो, ०१ टाटा टिगोर, ०१ महिंद्रा बोलेरो) पैकी ०५ नग टाटा इंडिगो वाहने जानेवारी २००९ चे उत्पादीत असुन आज रोजी सेवेमध्ये १५ वर्षापेक्षा जास्त कालावधी पुर्ण झालेला आहे. सदरील ०५ ही वाहने वेळोवेळी नादुरुस्त होत असुन दुरुस्ती खर्च देखील मोठया प्रमाणावर होत आहे.

तसेच सदर वाहने शासन धोरणानुसार निर्लेखित करुन स्क्रॅप करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे. प्रशासकीय सेवेमधील कामकाजामध्ये वाहनाअभावी विलंब व व्यत्यय निर्माण होत असल्याने व वाहनाच्या कमतरतेमुळे पर्यायी वाहनाची व्यवस्था करुन देणे देखील वाहन विभागामार्फत शक्य होत नसल्याने अधिकारी वर्गामार्फत तिव्र नाराजी वेळोवेळी व्यक्त केलेली आहे.

महानगरपालिके अंतर्गत प्रशासकीय सेवेत आज रोजी आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, ०३ उपायुक्त (सा.प्र.,महसुल, समाज कल्याण), ०३ सहा.आयुक्त, ०१ नगररचनाकार, मुख्यलेखाअधिकारी, मुख्यलेखापरिक्षक असे शासकीय अधिकारी वर्ग प्रशासकीय सेवेत कार्यरत असुन त्यांच्याकडे विविध विभागाचे कामकाजाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

प्रशासकीय सेवा गतिमान होणे कामी प्रशासकीय अधिकाऱ्यांना वेळोवेळी स्थळपाहणी, नागरीक समस्या सोडविणे कामी शहरात ठिकठिकाणी भेटी देणे, शासकीय, न्यायालयीन कामकाज तसेच विविध प्रकारच्या शासन स्थरावरील योजनांची माहिती व अंमलबजावणी कामी प्रशासकीय कामकाजासाठी वाहनांची नितांत आवश्यकता आहे. या पुर्वीच महासभेने ठराव क्र.२७ दि.१८/१०/२०१८ अन्वये प्रशासन गतिमान करण्याकामी प्रशासकीय वाहने खरेदी करणे आवश्यक आहे बाबत ठरावात नमुद आहे.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: वाहन-२०१७/प्र.क्र.४१/१७/विनियम दि.२८ जुलै २०२० अन्वये शासकीय वाहनांचे किंमत मर्यादा धोरणामध्ये नमूद केलेनुसार (अनुक्रमांक १५ नुसार) रु.९ लक्ष (वाहनाची किंमत + वस्तु व सेवा कर + टेम्पररी रजिस्ट्रेशन चार्जेस + सहाय्यभुत साहित्य (Accessories) इत्यादी अंतर्भूत करुन एकूण रु.०९ लक्षच्या मर्यादेत) महानगरपालिकेतील अधिकारी वर्गासाठी महानगरपालिकेस मारुती सुझुकी डिझायर व्हि.एक्स.आय वाहने खरेदी करता येतील

महाराष्ट्र शासन, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक-भांखस-२०१४/प्र.क्र.८२ भाग III/उदयोग-४ दि.०१/१२/२०१६ मधील ३.२.३ दरपत्रकाच्या आधारे खरेदी मुद्यांमधील रु.३ लाख ते ०१ कोटी पर्यंत खरेदीची किंमत असलेल्या ब्रॅन्डेड वस्तुची खरेदी DGS&D च्या दरकरारावर देखील करता येईल. तसेच कोणत्याही वाहनाचे दरकरार DGS&D कडे उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक / वितरक यांच्या दरपत्रकामार्फत देखील करता येईल.

प्रशासकीय सेवेमध्ये कार या प्रकारातील मारुती सुझुकी कंपनीमार्फत सादर करण्यात आलेल्या मॉडेल मधील डिझायर व्हि.एक्स.आय (पेट्रोल) हे मॉडेल घेण उचीत राहील. आयुक्त यांचेकडेस झालेल्या बैठकीत वेळोवेळी नविन वाहने खरेदी करण्याबाबत चर्चा झालेली असुन वाहने खरेदी बाबत प्रस्ताव सादर करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत करीता मानराज मोटर्स प्रा.लि.जळगांव यांनी दि.२७/०२/२०२५ अन्वये सादर केलेल्या प्रोफार्मा इनव्हाईस क्रं.२/PFI२४००००६ दि.२७/०२/२०२५ अन्वये मारुती डिझायर VXI १.२L

ISS ५ MT प्रकारातील मॉडेलच्या येणाऱ्या अंदाजीत खर्चाचे कृपया अवलोकन व्हावे. वाहन विभागामार्फत प्रस्तवित करण्यात आलेले मारुती डिझायर VXI १.२L ISS ५ MT (व्हाइट कलर) वाहन खरेदी करणे कामी रक्कम रु.८,९९,२९१/- मात्र प्रती वाहनापोटी असुन ०४ वाहने खरेदी करणे करिता रु.३५,९७,१६४/- मात्रचा अंदाजीत खर्च अपेक्षीत आहे.

तरी महानगरपालिका प्रशासकीय कामकाजा करिता मारुती डिझायर VXI १.२L ISS ५ MT (पेट्रोल) (व्हाइट कलर) एकुण ०४ वाहनांची खरेदी करण्याचे प्रस्तावित असुन प्रस्तावित खरेदी करावयाची ०४ वाहने मारुती सुझुकी कंपनीचे अधिकृत विक्रेते मानराज मोटर्स प्रा.लि.जळगांव यांच्या कडुन खरेदी करण्यास नविन वाहन खरेदी करण्याकामी अधिकृत विक्रेते मानराज मोटर्स प्रा.लि जळगांव यांनी दिलेला एकुण अंदाजित खर्च रक्कम रु.३५,९७,१६४/- मात्रच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता स्थायी समिती / प्रशासक यांची मान्यता मिळणेकामी तसेच प्रस्तावित सदर कामाचा खर्च वर्ष २०२४-२५ चे मंजुर अंदाजपत्रकातील मंजुर लेखाशिर्ष वाहन घसारा फंड अंतर्गत करणेस मान्यता मिळणेसाठी वाहन व्यवस्था प्रमुख, वाहन व्यवस्था विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३४** **(महासभा)**

**विषय क्र.:- १५** **प्रशासक ठराव क्र :-२६३** **दिनांक :-१२/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग प्रमुख यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/२०६१/२०२५ दि.११/०३/२०२५

३. मुख्य लेखाधिकारी यांचा दि.११/०३/२०२५ चा अभिप्राय

४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.११/०३/२०२५ चा अभिप्राय

५. आयुक्त यांचा दि.११/०३/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत विविध शासन निर्णया नुसार मनपास रक्कम रु.२२,८०,००,०००/- मात्रचे अनुदान प्राप्त झालेले आहे. सदरचे अनुदान हे शासन निर्णयानुसार ७५% रक्कम रु.१७,१०,००,०००/- खर्च करणे आवश्यक होते त्यामुळे त्यातील उर्वरीत २५% रक्कम रु.५,७०,००,०००/- मात्र अतिरिक्त प्राप्त झालेली आहे. सदर रक्कमे अंतर्गत मनपाचे विविध विकास कामे हाती घेण्यास व प्रस्तावीत केलेल्या ०१ ते २१ कामांच्या रक्कम रु.७,०८,९८,३५५/- मात्रच्या अंदाजपत्रकास मान्यता होणे बाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

माजी नगरसेवीका श्रीमती रेखा चुडामण पाटील प्रभाग क्रं.१४ अ यांचे दि.१२/०२/२०२५ चे पत्र प्राप्त झालेले आहे. त्यात महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत शासन प्राप्त शिल्लक निधी अंतर्गत खाली नमुद ०१ ते १७ कामे करुन मिळण्याबाबत सुचित केलेले आहे. त्यानुसार जळगांव शहर महानगरपालिके करीता सोबत दिलेल्या परिशिष्ट अ मध्ये नमुद प्रमाणे सन २०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीत मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत निधी मंजुर करण्यात आलेला आहे. सदरचा निधी हा ७५% शासन हिस्सा व २५% मनपा हिस्सा या प्रमाणात खर्च करण्यास मान्यताप्राप्त झालेल्या आहे.

महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत एकुण रक्कम रु.२२८००००००/- कोटी निधी मंजुर करण्यात आलेला आहे. सदरचा निधी हा ७५% खर्च होणार असल्याने उर्वरीत २५% रक्कम ही मनपा खजिन्यात रक्कम रु. ५७००००००/- मात्र शिल्लक राहणार आहे. तसेच मंजुर कामांकरीता खर्च होवून कामांमध्ये परिशिष्ट अ मध्ये नमुद प्रमाणे बचत झालेली व रद्द झालेल्या कामांची रक्कम रु.१९१४२७६४/- मात्र शिल्लक आहे. त्यामुळे सन्मा. मा.नगरसेवीका श्रीमती रेखा चुडामण पाटील प्रभाग क्रं.१४ अ यांनी खाली नमुद प्रमाणे ०१ ते १७ कामे निधीच्या २५% शिल्लक रक्कमेतुन करण्याची मागणी केलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम | तांत्रिक मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|
| १. | प्रभाग क्रं.१४ मधील स.नं.२७० व २६१ मध्ये रोड साईडला आर सी सी गटार बांधणे | ५००००००/- | ४९४९१४०/- |
| २. | प्रभाग क्रं.१४ मधील स.नं.२७४ मध्ये रोड साईडला आर सी सी गटार बांधणे | ३००००००/- | २९९१९९०/- |
| ३. | प्रभाग क्रं.१४ मधील स.नं.२६१ व २६२ मधील ओपनस्पेस विकसीत करणे | ३५०००००/- | ३४९७७४४/- |
| ४. | प्रभाग क्रं.१४ मधील स.नं.४३४/१ अ मधील ओपनस्पेस विकसीत करणे | १००००००/- | ९९९३००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | प्रभाग क्रं.१४ मधील स.नं.२५३/२ मधील ओपनस्पेस विकसीत करणे | १००००००/- | ९९९३००/- |
| ६. | प्रभाग क्रं.१४ मधील स.नं.२७० मधील ओपनस्पेस विकसीत करणे | १००००००/- | ९९९३००/- |
| ७. | प्रभाग क्रं.१४ मधील स.नं.२७१ मधील ओपनस्पेस विकसीत करणे | ४००००००/- | ३९९४४६३/- |
| ८. | प्रभाग क्रं.१४ मधील स.नं.४३५/अ गणपती नगर सातपुडा सोसायटी मधील ओपनस्पेस विकसीत करणे | १००००००/- | ९९९३००/- |
| ९. | प्रभाग क्रं.१४ मधील स.नं.२७४ मधील ओपनस्पेस विकसीत करणे | २००००००/- | १९९७३१७/- |
| १०. | प्रभाग क्रं.१४ मधील स.नं.४२२/अ मधील ओपनस्पेस विकसीत करणे | १००००००/- | ९९९३००/- |
| ११. | प्रभाग क्रं.१४ मधील स.नं.४३७ अ ब मधील ओपनस्पेस विकसीत करणे | १००००००/- | ९९५२५२/- |
| १२. | प्रभाग क्रं.११ विविध ठिकाणी आर सी सी गटार व कल्व्हर्ट बांधणे | १०००००००/- | ९९९९१४०/- |
| १३. | प्रभाग क्रं.१६ मध्ये ठिकठिकाणी आर सी सी गटार व कल्व्हर्ट बांधणे | ५००००००/- | ४९४९१४०/- |
| १४. | प्रभाग क्रं.१९ मध्ये ठिकठिकाणी आर सी सी गटार व कल्व्हर्ट बांधणे | ५००००००/- | ४९४९१४०/- |
| १५. | प्रभाग क्रं.०८ मध्ये ठिक ठिकाणी आर सी सी गटार व कल्व्हर्ट बांधणे | ५००००००/- | ४९४९१४०/- |
| १६. | प्रभाग क्रं.०९ मध्ये ठिक ठिकाणी आर सी सी गटार व कल्व्हर्ट बांधणे | ५००००००/- | ४९४९१४०/- |
| १७. | प्रभाग क्रं.०१ मध्ये ठिक ठिकाणी आर सी सी गटार व कल्व्हर्ट बांधणे | ३७०००००/- | ३६९४२५८/- |
| १८. | प्रभाग क्रं.१२ मधील मायादेवी नगर अ ब क मधील गटारी व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे | २९९१९९०/- | २९९१९९०/- |
| १९. | प्रभाग क्रं.१२ मधील सुरेश नगर ते स्टेट बॅक कॉलनी तायडेंच्या घरा पर्यंत व पवन हिल ओपनस्पेस ते महाले यांच्या घरापर्यंत आणि पवन हिल ओपनस्पेस ते वैशाली पाटील यांच्या घरापर्यंत रस्ते कॉंक्रिटीकरण करणे | ४९९८००४/- | ४९९८००४/- |
| २०. | प्रभाग क्रं.१२ मधील सदगुरु सोसायटी व इंद्रप्रस्थ नगर या भागातील गटारी व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे | ३५९८५२४/- | ३५९८५२४/- |
| २१. | प्रभाग क्रं.१४ मधील सं. नं.२५१/३ मध्ये रोड साईडला आर सी सी गटार बांधणे | २३९७४७३/- | २३९७४७३/- |
| | एकुण रक्कम रु. | ७११८५९९१/- | ७०८९८३५५/- |

वर नमुद ०१ ते २१ कामांचे अंदाजपत्रके सन २०२२-२३ जिल्हादर सुचिनुसार संबंधित कं.अभियंता यांच्या मार्फत एकुण रक्कम रु. ७०८९८३५५/- मात्रचे तयार करण्यात आलेले आहे. सदरचे ०१ ते २१ कामे हे वर नमुद मंजुर निधीतुन २५% निधी असे रक्कम रु ५७००००००/- शिल्लक होत असल्याने सदरचे कामे उर्वरीत निधीतुन करण्यास व सदरचे अंदाजपत्रकांना महासभा/प्रशासक यांची मान्यता घेवून प्रशासकीय व वित्तीय मान्यतेकरीता प्रस्ताव जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर तदपुर्वी निधी शिल्लक व खर्चा संदर्भात अर्थ विभागाकडुन अभिप्राय घेवुन पुढिल योग्य ती कार्यवाही होण्यास सादर.

मुख्य लेखाधिकारी अर्थ विभाग यांचा अभिप्राय पुढीलप्रमाणे- (१) विभागाने प्रस्तावित केलेनुसार अवर सचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्रं. मनपा-२०२२/प्रक्रं.६६ (०२)/नवि-१६ मंत्रालय, मुंबई दिनांक ११ एप्रिल २०२२ नुसार महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास योजने अंतर्गत सन २०२१-२२ साठी लेखाशिर्ष-२२१७०९१३ खाली रक्कम रु.२.८० कोटी मात्रचा निधी वितरीत करण्यात आलेला असुन मा. सह.आयुक्त नगरविकास शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव यांचेकडील पत्र क्रं. जा.क्रं./ ज.प.शाखा/जि.प्र.क/संकलन-७/१०१/२०२३ दिनांक २५/०८/२०२३ नुसार रक्कम रु.२८००००००/- मात्र धनादेश क्रं.०५०१६८ दिनांक २४/०८/२०२३ नुसार मनपास प्राप्त झालेला आहे. त्याबाबत तपशिल नस्ती सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये अवलोकनासाठी नमूद केलेला आहे.

(२) अवर सचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्रं. मनपा-२०२१/प्र.क्रं.१२१ (०२)/नवि-१६ मंत्रालय मुंबई दिनांक २० मे २०२२ नुसार महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विकास योजनेअंतर्गत सन २०२१-२२ साठी लेखाशिर्ष-२२१७०९१३ खाली रक्कम रु.५.०० कोटी मात्रचा निधी वितरीत करण्यात आलेला असुन सह.आयुक्त नगरविकास शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव यांचेकडील पत्र क्रं. जा.क्रं./ज.प.शाखा/जि.प्र.क/संकलन-७/१०२/२०२३ दिनांक २५/०८/२०२३ नुसार रक्कम रु.५,००,००,०००/- मात्र धनादेश क्रं.०५०१६७ दिनांक २४/०८/२०२३ नुसार मनपास प्राप्त झालेला आहे. त्याबाबत तपशिल नस्ती सोबतच्या परिशिष्ट "ब" मध्ये अवलोकनासाठी नमूद केलेला आहे.

(३) अवर सचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्रं. मनपा-२०२१/प्र.क्रं.१२१ (०२)/नवि-१६ मंत्रालय मुंबई दिनांक २१ मे २०२२ तसेच अवर सचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्रं. मनपा-२०२१/प्र.क्रं.१२१ (०२)/नवि-१६ मंत्रालय मुंबई दिनांक २१ एप्रिल २०२३ चे शुध्दीपत्रका नुसार महानगरपालिका क्षेत्रात

मुलभुत सोयी सुविधांचा विकास योजने अंतर्गत सन २०२१-२२ साठी लेखाशिर्ष-२२१७०९१३ खाली रक्कम रु.५.०० कोटी मात्रचा निधी वितरीत करण्यात आलेला असुन सह.आयुक्त नगरविकास शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव यांचेकडील पत्र क्रं.जा.क्रं./ज.प.शाखा/जि.प्र.क/संकलन-७/१६७/२०२३ दिनांक २९/१२/२०२३ नुसार रक्कम रु.५,००,००,०००/- मात्र धनादेश क्रं.०३८०८९ दिनांक २१/१२/२०२३ नुसार मनपास प्राप्त झालेला आहे. त्याबाबत तपशिल नस्ती सोबतच्या परिशिष्ट "क" मध्ये अवलोकनासाठी नमूद केलेला आहे.

(४) अवर सचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्रं. मनपा-२०२२/प्र.क्रं.२६ /नवि-१६ मंत्रालय मुंबई दिनांक १८ फेब्रुवारी २०२२ तसेच अवर सचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्रं. मनपा-२०२२/प्र.क्रं.२६/नवि-१६ मंत्रालय मुंबई दिनांक २० एप्रिल २०२३ चे शुध्दीपत्रक तसेच अवर सचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्रं. मनपा-२०२२/प्र.क्रं.२६/नवि-१६ मंत्रालय मुंबई दिनांक १४ स्टेंबर २०२३ चे शुध्दीपत्रकानुसार महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विकास योजने अंतर्गत सन २०२१-२२ साठी लेखाशिर्ष-२२१७०९१३ खाली रक्कम रु.१०.०० कोटी मात्रचा निधी वितरीत करण्यात आलेला असुन सह.आयुक्त नगरविकास शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव यांचेकडील पत्र क्रं. जा.क्रं./ज.प.शाखा/जि.प्र.क/संकलन-७/१६५/२०२३ दिनांक २८/१२/२०२३ नुसार रक्कम रु.९,००,००,०००/- मात्र धनादेश क्रं.०३८०९० दिनांक २१/१२/२०२३ नुसार तसेच सह.आयुक्त नगरविकास शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव यांचेकडील पत्र क्रं. जा.क्रं./ज.प.शाखा/जि.प्र.क/संकलन-७/१३९/२०२३ दिनांक ०७/१२/२०२३ नुसार रक्कम रु.१,००,००,०००/- मात्र धनादेश क्रं.०३८०८६ दिनांक ०६/११/२०२३ नुसार मनपास एकुण रक्कम रु. १०,००,००,०००/- मात्रचा निधी प्राप्त झालेला आहे. त्याबाबतचा तपशिल परिशिष्ट "ड" मध्ये अवलोकनासाठी नमूद केलेला आहे.

उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने सन २०२३-२४ या कालावधीमध्ये एकुण रक्कम रु.२२८००००००/- मात्रचा निधी प्राप्त झालेला असुन सदरहु शासन निर्णयातील अट क्रं.०३ नुसार एकुण प्राप्त झालेल्या रक्कमेतून सदर प्रकल्प खर्चाचा ७५% हिस्सा राज्य शासनाचा व २५% हिस्सा महानगरपालिकेचा राहणार असल्याचे नमूद केलेले आहे. त्यानुसार शासनाकडुन ७५% राज्य शासनाचा रककम रु.१७,१०,००,०००/- मात्रचा हिस्सा वरील शासन निर्णयांच्या अनुषंगाने वितरीत करणे अपेक्षित होते. परंतु शासनाकडुन २५% महानगरपालिकेचा रक्कम रु.५,७०,००,०००/- मात्र जादाचा अतिरिक्त पाठविण्यात आलेला हिस्सा वर नमूद केलेनुसार एकूण रक्कम रु.२२,८०,००,०००/- मात्रचा निधी महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे.

त्यानुसार रक्कम रु.१७,१०,००,०००/- मात्र मधुन ७५% राज्य शासनाच्या हिस्साची रक्कम विभागाने वेळोवेळी अदायगीसाठी सादर केलेल्या देयकानुसार अदा करण्यात येत आहे. परंतु अतिरिक्त २५% महानगरपालिकेला रक्कम रु.५७००००००/- मात्र जादाचा अतिरिक्त पाठविण्यात आलेला निधी हिस्सा मात्र महानगरपालिकेकडे जमा असल्याचे दिसुन येत आहे.

त्यानुसार बांधकाम विभागाने प्रस्तावित केलेला कामांसाठी शासनाकडून अतिरिक्त पाठविण्यात आलेल्या २५% रक्कम रु.५,७०,००,०००/- मात्रच्या प्राप्त निधीमधून शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या अनुषंगाने पुढील योग्य ती कार्यवाही करणेकामी मान्यता मिळणेसाठी शहर अभियंता,सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ व वाचा क्रं.२ ते ५ मधिल प्रस्तावा नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत तसेच आर्थिक अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**